पुण्य नगरी

# राष्ट्रहितासाठी साहित्याची निर्मिती व्हावी : डॉ.नरेंद्र पाठक

**म्हसदी :** साहित्यिक हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न साहित्यिकांनी कथा, कविता, कादंबरी यातून मांडावेत. सामाजिक व राष्ट्रहित घडविण्याच्या दृष्टीने साहित्यिकांनी साहित्याची निर्मिती करावी, असे प्रतिपादन डॉ. नरेंद्र पाठक यांनी केले.



येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय भाषा मंडळ आणि साहित्य अकादमी नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामलोक या साहित्यिक उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी साहित्य अकादमी नवी दिल्लीचे केंद्रीय कार्यकारणी मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र पाठक बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक अभियंता कुणाल देवरे होते. यावेळी शशिकांत घासकडबी, माजी प्राचार्य डॉ.एस.आर.पाटील, कवी तथा प्राथमिक शिक्षक नरेंद्र खैरनार, डॉ. सविता पटेल, प्रशांत बागुल, प्रवीण पवार, सुभाष अहिरे उपस्थित होते. डॉ. पाठक म्हणाले, साहित्य अकादमी फक्त पुरस्कारापुरती मर्यादित नसून साहित्याचे वाचन, लेखन व एकूणच साहित्य चळवळ गावपाड्यापर्यंत पोहोचली पाहिजे. साहित्य अकादमीचा हा उद्देश असल्यामुळेच ग्रामलोक हा कार्यक्रम देऊर खुर्द या लहानशा खेड्यात घेण्यात आला. साहित्य प्रेमींना एकत्र आणणे हे अकादमीचे कार्य आहे. साहित्य, संस्कृती आणि भाषा हे विषय राजकारणाचे नाहीत. साहित्यिकांनी अभिव्यक्त झाले पाहिजे. साहित्य अकादमीचे कार्य कसे चालते याविषयी डॉ. पाठक यांनी माहिती दिली. अभियंता कुणाल देवरे, प्रशांत बागुल, प्रवीण पवार, नरेंद्र खैरनार, सुभाष अहिरे, डॉ.सविता पाटील यांनी कविता सादर केल्या. सूत्रसंचलन प्रा. जगदीश याद यांनी केले. आभार प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी मानले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात देऊर जि.प. मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी खान्देश लोकधारा हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. त्यातून खान्देशातील लोकसंस्कृतीचे दर्शन घडले. तिसऱ्या सत्रात निमंत्रित कवींचे बहुभाषिक काव्य संमेलन झाले. या संमेलनाचे उद्घाटन शशिकांत घासकडबी यांच्या हस्ते झाले. या काव्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील होते. यावेळी देऊर खुर्द सरपंच पुनम देसले, उपसरपंच काशिनाथ माळी, पोलिस पाटील मनोज खोंडे, सुदाम देसले, रावसाहेब देसले, भटू साळवे, हंसराज देसले, अमर देसले, सतिश देसले, प्रेमसिंग गिरासे उपस्थित होते. काव्य संचालन कवी रावसाहेब कुवर यांनी केले. याप्रसंगी त्रिशिला साळवे, प्रमिला मराठे, गुलाबराव मोरे, देवराज कपाटे, दत्ता कल्याणकर, अशोक तोरवणे, आधार चव्हाण, दिलीप लोखंडे, रामदास धोंडगे, रोहित ठाकूर, नितीन अहिरराव यांनी काव्य वाचन केले. डॉ. एस. आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी ग्रामलोक या उपक्रमाच्या माध्यमातून साहित्य अकादमी तळागाळातील साहित्यिक वाचकांपर्यंत पोहोचण्याचे महत्त्वाचे कार्य करत असल्याचे मत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. वाल्मिक अढावे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. मिलिंदकुमार देवरे व डॉ. विजय जाधव यांनी केले. आभार डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक गोविंदराव नेरकर, सोमनाथ देवरे, मनिषा पाटील यांनी परिश्रम घेतले.

Dhule Edition
Dec 7, 2024 Page No. 03